# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०३.०२.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०२/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३२,७००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ०२/०२/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०७ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ५४.६६ लिटर दारू असा एकुण ९,६५०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. ०२/०२/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ३,६४०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. ०२/०२/२०२३ रोजी पोस्टे कळमनुरी येथे ०१ इसमाविरूध्द कलम ४/२५ भाहका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**बनावट चलनी नोटा बाळगणाऱ्या विरूध्द गुन्हा नोंद :—**

दिनांक ०२/०२/२०२३ रोजी पोस्टे औंढा नागनाथ येथे फिर्यादी मुजाफर नजीर शेख वय ३४ व्य.खाजगी नौकरी जात मुस्लीम रा हिनानगर चिखलठाणा ता जि औरंगाबाद यांचे फिर्यादीवरून कलम ४२०,४८९बी,१२०बी भादंवि अन्वये गुन्हा दाखल असुन यातील नमुद आरोपीने कट रचुन फिर्यादीस पैसे तिप्पट देतो असे फिर्यादीस अमिष दाखवुन चलनी १२,५०,००० रू घेवुन त्याबदल्यामध्ये नकली नोटा भारतीय बच्चे का बॅक असे लिहीलेल्या ५०० रू दराच्या नोटाचे ११ बंडल ज्यापैकी प्रत्येक बंडलमध्ये वरील बाजुस एक व खालील बाजुस एक अशा दोन ५०० रू दराच्या २२ नोटा व आतील बाजुस भारतीय बच्चो का बॅक असे लिहीलेल्या ५०० रू दराच्या नकली ६५७८ नोटा सर्व मिळुन किमंती ३३,००,००० रू मदेमाल देवुन फसवणुक केली म्हणुन गुन्हा नोंद होवुन या संदर्भात औंढा ना. पोलीस तपास करित आहेत.